# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः19.01.2026** **वारःसोमवार**

---

1. विकसित भारताच्या संकल्पनेसाठी पूर्व भारताचा विकास हा केंद्रस्थानी-पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. गाझामध्ये शांततेसाठी तयार करण्यात आलेल्या 'बोर्ड ऑफ पीस'मध्ये सहभागी होण्याकरिता अमेरिकेचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आमंत्रण
3. स्वित्झर्लंडमध्ये आजपासून 56 वी जागतिक आर्थिक मंचाची बैठक आणि
4. भारत न्युझिलंडदरम्यानच्या 50 षटकांच्या मालिकेत पाहुण्यांचा विजय

**पंतप्रधान**

विकसित भारताच्या संकल्पनेसाठी पूर्व भारताचा विकास हा केंद्रस्थानी आहे आणि केंद्र सरकार या ध्येयाच्या दिशेने सातत्याने काम करत आहे. असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल केलं. पश्चिम बंगालमधील हुगली जिल्ह्यात सिंगुर इथं 830 कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते झालं. त्यावेळी ते बोलत होते. पायाभूत सुविधा आणि दळणवळण क्षमता मजबूत करण्यासाठी पश्चिम बंगालमध्ये शेकडो कोटी रुपयांचे प्रकल्प राबवले जात आहेत. असंही मालदा आणि हुगली या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर बोलताना ते म्हणाले.

काल पंतप्रधानांच्या हस्ते कोलकाता ते दिल्लीतील आनंद विहार टर्मिनल, बनारस आणि तामिळनाडूतील तांबाराम या स्थानकांना जोडणाऱ्या आणखी तीन अमृत भारत एक्सप्रेस गाड्यांना हिरवा झेंडा दाखवण्यात आला. बंगालमध्ये बंदरं आणि जलमार्गांवर आधारित विकासासाठी केंद्र सरकार करत असलेल्या प्रयत्नांबाबत माहिती दिली. बंदरं आणि अंतर्गत जलमार्गांशी संबंधित प्रकल्प राज्याला उत्पादन, व्यापार आणि लॉजिस्टिक्सचे केंद्र बनवण्यास मदत करतील, तसेच रोजगाराच्या संधी निर्माण करतील. असं मोदी म्हणाले. देशातील पहिली वंदे भारत शयनयान रेल्वेगाडी शनिवारी पश्चिम बंगालमधून सुरू करण्यात आली, तर राज्याला यापुर्वी एकंदर 6 अमृत भारत एक्सप्रेस रेल्वेगाड्याची सेवा मिळाल्या आहेत. असंही ते म्हणाले.

**पंतप्रधान-ट्रंप**

इस्त्रायल आणि पॅलेस्टाईन संघर्षाच्या पार्श्वभूमीवर गाझामध्ये कायमस्वरुपी शांतता प्रस्थापित करण्याच्या दिशेने काम करण्याच्या उद्देशाने निर्माण करण्यात आलेल्या गटात अर्थात 'बोर्ड ऑफ पीस'मध्ये सहभागी होण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आमंत्रित केलं आहे. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी या संदर्भात मोदी यांना पत्र पाठवले आहे, हे पत्र भारतातील अमेरिकेचे राजदूत सर्जियो गोर यांनी समाजमाध्यमावर शेअर केलं आहे. आपल्या पत्रात ट्रम्प यांनी म्हटले आहे की, मध्य पूर्वेत शांतता दृढ करण्याच्या प्रयत्नात पंतप्रधानांना आपल्यासोबत सामील होण्यासाठी तसंच जागतिक संघर्ष सोडवण्यासाठी एका धाडसी नवीन दृष्टिकोनाची सुरुवात करण्याच्या उद्देशाने आपण हा पुढाकार घेतला आहे. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी गाझा पट्टीत इस्त्रायल आणि हमास यांच्यातील युद्धविराम कराराच्या दुसऱ्या टप्प्याचा भाग म्हणून या मंडळाची स्थापना केली आहे. गेल्या ऑक्टोबरमध्ये, इस्त्रायल आणि हमास या गटाने ट्रम्प यांच्या शांतता योजनेला सहमती दर्शवली होती. मध्य पूर्वेत शांतता प्रस्थापित करण्यासाठी 20 -सूत्रीय आराखडा तयार करण्यात आला आहे.

**मुख्यमंत्री-दावोस**

जागतिक आर्थिक मंचची बैठक आज स्वित्झर्लंडमधील दावोस इथं सुरू होत आहे. या 56 व्या वार्षिक बैठकीला 3 हजारहून अधिक जागतिक नेते उपस्थित राहणार आहेत. या पाच दिवस चालणाऱ्या परिषदेत सहभागी होण्यासाठी 100 हून

अधिक भारतीय कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सरकारी शिष्टमंडळ दावोसमध्ये दाखल झाले आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव, प्रल्हाद जोशी आणि के. राममोहन नायडू यांच्यासह महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, आसाम आणि झारखंडचे मुख्यमंत्री विविध देशांच्या गुंतवणूकदारांसमोर आपापल्या राज्यांचे सादरीकरण करतील. कर्नाटक, उत्तर प्रदेश, केरळ आणि तेलंगणासह विविध राज्य सरकारांच्या कामाची माहिती देणारे प्रदर्शनात सहभागी होतील. या परिषदेत सहभागी होण्यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काल दावोसला पोहोचले. जागतिक व्यासपीठावर भारताचे विकास इंजिन म्हणून 'मॅग्नेटिक महाराष्ट्र' अधिक बळकट करण्याचा निर्धार असून, महाराष्ट्राची 1 ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे वाटचाल अधिक वेगवान करण्यासाठी ही परिषद महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

**राजनाथसिंह**

देशाला संरक्षण उत्पादन क्षेत्रात आत्मनिर्भर बनवणे हे सरकारचं प्रमुख उद्दिष्ट असल्याचं प्रतिपादन केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी काल नागपूरमध्ये बोलताना केलं. सिंह यांच्या उपस्थितीत, शिवा-सावंगा परिसरात स्थापन केलेल्या मध्यम क्षमता दारुगोळा सुविधा केंद्रात पिनाका गायडेड रॅकेटचं पाहिलं उत्पादन पाठवण्यात आलं. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यावेळी उपस्थित होते.

**अमेरिका**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी ग्रीनलँडच्या मुद्द्यावरून केलेल्या घोषणेच्या पार्श्वभूमीवर 1 फेब्रुवारीपासून डेन्मार्क, नॉर्वे, स्वीडन, फ्रान्स, जर्मनी, ब्रिटन, नेदरलँड्स आणि फिनलंडमधून येणाऱ्या वस्तूंवर 10 टक्के शुल्क लावेल अशी घोषणा आठ युरोपीय राष्ट्रांनी काल केली. युरोपीय राष्ट्रांचे संयुक्त निवेदनाद्वारे ही माहिती दिली. नाटोचे सदस्य म्हणून, आम्ही डेन्मार्कचे राज्य आणि ग्रीनलँडच्या लोकांसोबत पूर्णपणे एकजुटीने उभे आहोत. असंही निवेदनांत म्हटलं आहे. जर्मनी, डेन्मार्क, फिनलंड, फ्रान्स, नेदरलँड्स, नॉर्वे, स्वीडन आणि ब्रिटन या राष्ट्रांटा यात समावेश आहे.

**युएई**

संयुक्त अरब अमिरातीचे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाह्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणावरून आज भारताच्या अधिकृत दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यामुळे भारत आणि संयुक्त अरब अमिरातीदरम्यान व्यापक धोरणात्मक भागीदारीला चालना मिळेल आणि परस्पर हिताच्या प्रादेशिक तसंच जागतिक मुद्द्यांवर विचारविनिमय होईल अशी अपेक्षा आहे. यूएईचे अध्यक्ष झाल्यापासून त्यांचा भारताचा हा तिसरा अधिकृत दौरा आहे.

**भाजपा**

भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी आज उमेदवारी अर्ज दाखल केले जाणार आहेत. पक्षाचे राष्ट्रीय निवडणूक अधिकारी आणि खासदार के. लक्ष्मण यांनी काल निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. उमेदवारी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, आवश्यक असल्यास, उद्या मतदान होईल.

**नक्षली**

छत्तीसगढमधील बीजापूर जिल्ह्यात सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत चार महिला नक्षलींसह सहा नक्षलवादी काल झालेल्या चकमकीत ठार झाले. छत्तीसगढ जिल्हा राखीव दल, कोब्रा आणि विशेष कृती दलाच्या संयुक्त पथकाने ही कारवाई केली..

**जम्मू-काश्मिर**

जम्मू आणि काश्मीरमध्ये, काल संध्याकाळी किश्तवाड जिल्ह्यात दुर्गम वनक्षेत्रात दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत लष्कराचे आठ जवान जखमी झाले. जखमी जवानांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. लष्कराच्या जम्मूस्थित 'व्हाइट नाइट कोरने 'ऑपरेशन त्राशी-1' अशा नावाची ही मोहीम काल सुरू झाली. 'एक्स' या समाजमाध्यमवर व्हाइट नाइट कोरने ही माहिती

दिली आहे. पाकिस्तानस्थित जैश-ए-मोहम्मद या संघटनेशी संबंधित दहशतवादी गटाचे सदस्य दडून बसले असल्याची माहिती मिळाल्यानंतर  सुरक्षा दलाने राबवलेल्या शोधमेहिमेदरम्यान चकमक झाली.

**<u>संमेलन</u>**

86 वे अखिल भारतीय पीठासीन अधिकारी संमेलन आज उत्तर प्रदेशमधील लखनौमध्ये विधानसभेत सुरू होणार आहे. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला उद्घाटन सत्राला संबोधित करतील. या संमेलनादरम्यान, विधीमंडळातील पीठासीन अधिकारी, सचिव आणि विविध विभागांचे प्रतिनिधी कायदेविषयक प्रक्रिया, संसदीय परंपरा, सभागृहाचे कामकाज, सुशासन आणि सध्याच्या कायदेविषयक मुद्द्यांवर विस्तृत चर्चा आणि विचारमंथन करतील.

**<u>इराण</u>**

इराणमध्ये सुरु असलेल्या अशांततेच्या पार्श्वभूमीवर आतापर्यंत 5 हजार नागरिकांचा मृत्यू झाला असल्याची माहिती एका इराणी अधिकाऱ्यांनी काल दिली. यामध्ये सुरक्षा दलाच्या एकंदर 500 सदस्यांचा समावेश आहे. त्या अधिकाऱ्याने या मृत्यूंसाठी 'दहशतवादी आणि सशस्त्र दंगलखोरांना' जबाबदार धरले आहे. 28 डिसेंबर रोजी वाढत्या महागाईविरोधात तसंच देशांतर्गत आर्थिक अडचणीं विरोधात इराणमधील नागरिकांवी निदर्शनं सुरु केली आणि हे आंदोलन देशभरात पसरलं आहे.

**<u>अपघात-स्पेन</u>**

दक्षिण स्पेनमध्ये ॲडामूझ शहरानजिक दोन वेगवान रेल्वेगाड्यांमध्ये झालेल्या धडकेत किमान 21 लोकांचा काल मृत्यू झाला आणि किमान 73 लोक गंभीर जखमी झाले आहेत. अशी माहिती स्पेनमध्ये रेल्वेसेवा देणाऱ्या कंपनीनं दिली. बचाव पथके रुळावरून घसरलेल्या डब्यांमध्ये अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्याचे काम करत आहेत.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि न्यूझीलंड दरम्यान काल इंदौर मध्ये खेळल्या गेलेल्या एक दिवसीय सामन्यात न्यूझीलंड संघाने भारताचा 41 धावांनी पराभव करत एक दिवसीय सामन्यांची मालिका 2-1 अशी जिंकली. मालिकेतील तिसऱ्या आणि अंतिम सामन्यात, न्यूझीलंड संघाने दिलेल्या 338 धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय संघाने 46 षटकांत 296 धावा फटकावल्या. विराट कोहलीने सामन्यात शतक झळकावलं. भारताची सुरुवात अडखळत झाली. पहिल्या 13 षटकांत संघाने 4 गडी गमावले. न्यूझीलंडच्या डेरील मिचेलला सामनावीर तसंच मालिकावीर म्हणून घोषित करण्यात आलं. 1989 पासून न्यूझीलंड भारतात भारताविरूध्द 50 षटकांच्या सामन्यांची मालिका खेळत आहे मात्र ही मालिका प्रथमच जिंकली आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार